# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेसनोट २२७-२२ दिनांक २८/०७/२०२२

## कायदेशीर कंपनी असल्याचे भासवून बनावट GST व चेकच्या आधारे व्यापा-याची फसवणूक करणा-या आरोपीतांना अटक व ६,०३,५००/- रुपये किं.चा मुद्देमाल हस्तगत- वालीव पोलीस स्टेशनची कामगिरी.

वालीव पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रात सातीवली येथील तक्रारदार श्री. इंद्रलाल अग्रहारी व्यवसाय- ‘छाया प्लास्टिक’ कंपनी या व्यापा-याकडे दिनांक १५/०७/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजताचे सुमारास आरोपीत नामे इस्माईल व सुशील दोडा यांनी तक्रारदार इंद्रलाल अग्रहारी यांना आपण ग्राहक असल्याचे व त्यांची स्वतःची कैलास कॅटस्पुन इंडस्ट्रीज कंपनी, भिवंडी वडपे येथे कंपनी असल्याचे भासवून त्या कंपनीचा खोटा जी. एस. टी. नंबर देवुन ६,०३,५००/- रुपये किंमतीचे एकुण ७१० नग प्लास्टीकचे पॅलेट कंपनीमधील सामान ठेवण्याकरिता वापरण्यात येणारे प्रती पॅलेट ८५०/- रुपये किंमतीचा माल फसवणुक करुन नेला होता. त्याबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वालीव पोलीस ठाणे येथे I गुरनं. ७१३/२०२२ भा.दं.वि.स. कलम ४२०, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा सखोल तपास केला असता समजुन आले की, यातील आरोपीत यांनी त्यांचेकडील कंपनी ही कायदेशीर असल्याचे भासवून तसेच सदर कंपनीचा बनावट जी. एस. टी. क्रमांक देवून फिर्यादी यांची फसवणूक केलेली आहे. त्यामुळे प्राप्त पुराव्याच्या आधारे यातील आरोपीत नामे १) सुशील होलाराम दोडा, राहणार-भिवंडी, जि. ठाणे यास दिनांक २३/७/२०२२ रोजी सदर गुन्हयात अटक करुन मालाविषयी विचारपुस केली असता त्याने सदरचा माल आरोपीत नामे २) ईम्रान शेर खान राहणार- भिवंडी ठाणे, ३) सलमान अलीहुसेन खान राहणार- भिवंडी ठाणे यांना विकला असल्याचे सांगीतले. सदर माल विकत घेणा-या आरोपीतांनी मालाविषयी कोणतीही खात्रीशीर माहिती न घेता जास्त नफ्याचे अमिषाने सदरचा माल विकत घेतल्याने सदर गुन्हयाचे तपासामध्ये भादंवि कलम ४११ हे वाढिव कलम लावण्यात येवून त्यांना अटक करण्यात आली आहे. सदर गुन्हयाचे तपासादरम्यान ६,०३,५०० /- रुपये किंमतीचे एकुण ७१० नग हस्तगत करण्यात वालीव पोलीसांना यश आले आहे.

वरील कामगिरी श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ - २ वसई, श्री. पंकज शिरसाट, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, श्री. राहुलकुमार पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), गुन्हे प्रकटिकरण शाखेचे सपोनि/ज्ञानेश फडतरे, पोहवा/मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, राजेंद्र फड, पोना /सतिश गांगुर्डे, पो.अंम.गजानन गरीबे, सचिन मोहीते, सचिन खताळ, जयवंत खंडवी यांनी यशस्विरित्या पार पाडली आहे.


वालीव पोलीस ठाणे
महाराष्ट्र राज्य पोलीस
महाराष्ट्र राज्य पोलीस
By Metro City 2022.07.28 13:04